# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०८ ऑगस्ट, २०१७ / श्रावण १७, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री** | |
| **(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३) पर्यावरण मंत्री** | |
| **(४) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५८**

---

## राज्यातील नगरपरिषदेच्या उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना सुधारीत वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबत

**(१) * ३३९६४ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगर परिषदेमधील कार्यरत उच्च माध्यमिक शिक्षकांना १९९६ पासून सुधारीत वेतनश्रेणीचा (काल्पनिक) लाभ देण्याबाबतची मागणी अमरावती विभाग शिक्षक आघाडी यांनी निवेदनाद्वारे केली असून याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नगर परिषदेमधील कार्यरत उच्च माध्यमिक शिक्षकांना सुधारीत वेतनश्रेणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) दिनांक २६/२/२०१४ च्या शासन निर्णयान्वये उच्च माध्यमिक शिक्षकांना १९९६ पासून सुधारीत वेतनश्रेणीचा (काल्पनिक) लाभ देण्यात आला असून अनुज्ञेय थकबाकी अदा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२) * ३४४३१ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नवीन शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीलाच सुमारे १५४२३ प्राथमिक शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या शासनाच्या मुख्य उपक्रमावर व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याने शासनातर्फे प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांतर्गत प्राथमिक शाळांपैकी काही शाळांमध्ये विद्यार्थी संख्या कमी असून शिक्षक जास्त असल्याचे तर काही शाळांमध्ये विद्यार्थी जास्त शिक्षक कमी असल्याचे आढळून आले. विद्यार्थी संख्येवर आधारित शिक्षक संख्येनुसार सद्य:स्थितीत शिक्षक संख्या पुरेशी आहे.

(२) विद्यार्थ्यांची गुणवत्ता व प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र उपक्रमावर कोणताही विपरित परिणाम झालेला नाही. तथापि राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शैक्षणिक संस्था अनुदानित अंशत: अनुदानित व अनुदानास पात्र घोषित केलेल्या व शाळांमधील शिक्षकभरती अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षेतील गुणांच्या आधारे करण्याचा निर्णय दि.२३/६/२०१७ रोजी घेण्यात आलेला आहे.

सदर परीक्षा शासन निर्णय दिनांकापासून ६ महिन्याच्या आत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नव्याने पदे निर्माण करण्यासाठी समिती स्थापन करण्याबाबत

**(३) * ३३१३८ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चिपळूणकर व गोगटे समितीतील त्रुटी दूर करुन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नव्याने पदे ठरविण्यासाठी सर्वसाधारण समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचे अध्यक्ष तत्कालीन शिक्षण आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी मान्य करण्यात आल्या मात्र मागील दिड वर्षापासून या समितीने सुचविलेल्या शिफारशींची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यात खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांना साहित्यासाठी शुल्क देण्याबाबत

**(४) * ३४२९५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यांतर्गत खाजगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवर गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत असला तरी प्रत्येक विद्यार्थ्यामागे येणाऱ्या शैक्षणिक खर्चाची रक्कम शासनाकडून वेळेवर मिळत नसल्याने याबाबत शाळा महापालिकेस आणि महापालिका शासनास जबाबदार समजत असून त्याचा परिणाम पालकांवर होत असल्याचे दिनांक २५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यानुसार २५ टक्के कोटयामधून प्रवेश घेतलेल्या बालकांना लेखन साहित्य, पाठयपुस्तके आणि गणवेश मोफत मिळणे बंधनकारक असताना शासकीय शाळांमध्ये प्रत्येक बालकामागे जितका खर्च शासन करते तितकी रक्कम २५ टक्के कोट्यातून प्रवेश घेतलेल्या बालकांचे शुल्क व इतर शैक्षणिक खर्च खाजगी शाळांना देण्यात येईल असा शासन निर्णय आहे त्यानुसार ही रक्कम शासनाकडून महानगरपालिकेमार्फत खाजगी शाळांना देण्यात येत असून २५ टक्के कोट्यातून प्रवेश घेतलेल्या बालकांचे शुल्क व इतर शैक्षणिक खर्च खाजगी शाळांना देण्यात येतो, परंतू ती रक्कम वेळेत न मिळाल्याने गरीब पालकांना त्याचा भुर्दंड सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रक्कम शासनाकडून महानगरपालिकेमार्फत खाजगी शाळांना देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) शिक्षणाधिकाऱ्यामार्फत आरटीई २५ टक्के प्रवेशित विद्यार्थ्यांची फी प्रतिपूर्ती शाळांना दिली जाते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना थकीत वेतन देण्याबाबत

**(५) * ३३२२९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषदेंतर्गत बृहत आराखडयातील वाढीव पदावर कार्यरत शिक्षकांचे माहे डिसेंबर, २०१५ पूर्वीचे थकीत वेतन अदा करण्याच्या मागणीसाठी शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक ८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास धरणे अंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात वाढीव पदावर किती शिक्षक कार्यरत असून थकीत वेतनाची रक्कम किती आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित शिक्षकांना थकीत वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हयात वाढीव पदावर एकूण ७९३ प्राथमिक शिक्षक कार्यरत असून त्यांच्या थकीत वेतनाची रक्कम रुपये ३५,९१,०२,३३३/- (अक्षरी रुपये पस्तीस कोटी एक्क्यानऊ लाख दोन हजार तीनशे तेहत्तीस फक्त) इतकी आहे.

(३) शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयात तंत्र शास्त्र विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत

**(६) * ३१३१८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात मागील चार वर्षापासून दुष्काळ व नापिकीमुळे बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झाल्याने बीड आणि उस्मानाबाद या अवर्षण जिल्हयात कुशल कामगार निर्माण करण्यासाठी तंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठ, लोणेरे या विद्यापीठाच्या औरंगाबाद व नांदेड येथील उपकेंद्रास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या विविध समित्यांनी केलेल्या शिफारशीनुसार मराठवाड्यातील बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी अवर्षणग्रस्त बीड जिल्ह्यात तंत्र शास्त्र विद्यापीठ किंवा विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठाच्या औरंगाबाद येथे प्रादेशिक केंद्र व नांदेड येथे उपप्रादेशिक केंद्र स्थापन करण्याची कार्यवाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठाकडुन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मराठी चित्रपट निर्मात्यांचे थकीत अनुदान देण्याबाबत

**(७) * ३४३५९ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी चित्रपट निर्मात्यांना शासनाने मागील ३ वर्षात अनुदानास पात्र असूनही अनुदान दिले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून यामुळे मराठी चित्रपट निर्मात्यांमध्ये कर्जबाजारीपणाचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुदानासाठीच्या प्रस्तावावर निर्णय घेऊन मराठी चित्रपट निर्मात्यांचे थकीत अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवीन पालघर जिल्ह्यात वेतनपथक प्राथमिक/माध्यमिक कार्यालय स्थापन करण्याबाबत

**(८) * ३४३०९ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयाचे दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी विभाजन करुन नवीन पालघर जिल्हयाची निर्मिती होवूनही सदर जिल्हयात वेतनपथक प्राथमिक/माध्यमिक कार्यालय अद्यापही स्थापन झाले नसून पालघर जिल्हयातील प्राथमिक व माध्यमिक अशासकीय खाजगी शाळांची वेतन देयके व इतर देयके वेतनपथक ठाणे कार्यालयात आहरीत व संवितरित केली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची देयके सादर करण्यासाठी सदर शाळांतील कर्मचारी वर्गास आर्थिक भुर्दंड सोसून व कार्यालयातील कामाचा वेळ वाया घालवून सदरची देयके सादर करण्यासाठी ठाणे येथे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वेतनपथक प्राथमिक/माध्यमिक कार्यालय स्थापन करण्यास किती कालावधी लागण्याची शक्यता आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वेतनपथक प्राथमिक/माध्यमिक कार्यालय स्थापन करण्याबाबत कार्यवाही करुन सदरची वेतनपथक प्राथमिक/माध्यमिक कार्यालये अद्यापही सुरू न होण्यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) मुळ ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून नवीन पालघर जिल्हा निर्माण करण्यात आला असून सदर जिल्ह्यासाठी आतापर्यंत शालेय शिक्षण विभागांतर्गत ३२ पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. मात्र अद्याप वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय स्थापन करण्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यामुळे देयके ठाणे येथील वेतन व भ.नि.नि कार्यालयात सादर करण्यात येत आहेत.

(३) प्राथमिक व माध्यमिक विभागांकरिता स्वतंत्र वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालयांसाठी पदांना मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयात वृध्द कलाकारांच्या मानधनाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(९) * ३१२३६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील समाजकल्याण विभागात मागील दोन वर्षापासून १२२८ वृध्द कलाकारांच्या मानधनाचे प्रस्ताव निर्णयाअभावी प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावांच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्याचे संबंधित कार्यालयाकडून सांगण्यात येत असल्याने वृध्द कलाकारांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावांना मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

वृध्द कलावंत मानधन योजनेंतर्गत वृध्द कलावंतांची निवड करण्याकरिता जिल्हास्तरीय निवड समितीची बैठक दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांवर कारवाई करण्याबाबत

**(१०) * ३३४२८ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने निर्धारित केलेल्या निकषांची पूर्तता न करणा-या राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांवर कोणती कारवाई करणार याबाबत मा.उच्च न्यायालयाने शासनास माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान विचारणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आतापर्यंत किती महाविद्यालयांवर कारवाई केली व त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) सदर बाब शासनास अवगत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोंड उमरे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) गावाला पाणीपुरवठा करण्याबाबत

**(११) * ३४४०२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंड उमरे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील ग्रामपंचायत उमरे कार्यक्षेत्रातील गावाला शासनाच्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेंतर्गत होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची पाईपलाईन सुमारे २५ वर्षे जुनी असून ती वारंवार फुटत असल्यामुळे गावाला सुरळीत पाणीपुरवठा होत नसल्याने उन्हाळयाच्या दिवसात पाणीटंचाईच्या काळात या गावातील ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर गावाला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन पूर्णपणे बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
गावाला नियमित पाणीपुरवठा सुरु आहे. तथापि, पाईपलाईन लिकेज किंवा वीजपुरवठा खंडीत झाल्यास पाणीपुरवठयामध्ये तात्पुरता व्यत्यय येतो.
(३) सदर गावाला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन बदलण्याच्या कामाचा, जिल्हा देखभाल दुरुस्ती अंतर्गत समावेश करणेत आला असून, त्याप्रमाणे अंदाजपत्रक करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घुग्गुस (ता.जि.चंद्रपूर) येथील लॉयडस मेटल कंपनीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(१२) * ३३९४७ श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक २३५७० ला दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घुग्गुस (ता.जि.चंद्रपूर) येथे लॉयडस मेटल कंपनी अनेक वर्षांपासून कच्चे लोखंड तयार करुन त्याचा व्यापार करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीच्या मालावर कोणतेही आवरण न घातल्याने त्यापासूनच्या धुळीकणाने चंद्रपूर शहर व त्यापरिसरातील वातावरण प्रदुषित होवून तेथील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याचे तसेच त्या परिसरातील शेतजमिनी नापिक झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्या अहवालानुसार सन २०१४-१५ ते २०१५-१६ या वर्षात आजाराच्या प्रमाणात वाढ झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त कारखान्याची पाहणी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर यांच्या अहवालानुसार आजाराच्या प्रमाणात सन २०१४-१५ ते २०१५-१६ या वर्षात वाढ झाल्याचे दिसून येते. तथापि सदरील आजार प्रदुषणामुळे होत आहेत, याबाबत स्वयंस्पष्ट उल्लेख नाही. तसेच, परिसरातील शेतजमिनीचे नुकसान झाल्याचे दिसून आले नाही, असे जिल्हा कृषी अधिक्षक अधिकारी, चंद्रपूर यांनी कळविले आहे.
(३) प्रश्नाच्या अनुषंगाने केलेल्या पाहणीनुसार सदर उद्योगाने हवा प्रदूषण नियंत्रणासाठी बसविलेल्या सयंत्रणा कार्यरत असल्याचे आढळले. तथापि उद्योगास घालून दिलेल्या शर्तींचे पूर्णत: अनुपालन झाले नसल्याने सदर उद्योगास ताकीदपत्र व कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाच्यावतीने शेतकरी व शेतमजूरांच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्याबाबत

**(१३) * ३१४९५ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाच्यावतीने शेतकरी व शेतमजूरांच्या मुलांना दिली जाणारी शिष्यवृत्ती बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागवूनही विद्यापीठाने भूमिका बदलल्याने शेतकरी व शेतमजूरांच्या मुलांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागणार असल्याने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत विद्यार्थी संघटनांच्यावतीने मागणी/आंदोलने केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.

काही विद्यार्थ्यांची काही कालावधीची शिष्यवृत्ती अदा करावयाची राहिली होती त्यानुषंगाने विद्यार्थी संघटनेकडून विद्यापीठाकडे निवेदन प्राप्त झाले होते.
(३) व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २७/०६/२०१७ च्या सभेतील मान्यतेनूसार उर्वरित रक्कम विद्यार्थ्यांना अदा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्यात २ मे, २०१२ नंतर नियुक्त केलेल्या शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देण्याबाबत

**(१४) * ३३७४९ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक २ मे, २०१२ पासून शिक्षक भरतीला बंदी घालण्यात आली असून सदर भरती बंदी प्रक्रियेतून गणित, इंग्रजी व विज्ञान विषयाच्या पद भरतीला मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ४ सप्टेंबर, २०१३ च्या शासन आदेशाने राज्यातील विभाग निहाय इंग्रजी ६२८ शिक्षक, गणित ५१६ शिक्षक व विज्ञान ४५५ असे एकूण १५९९ शिक्षकांना मान्यता देण्याबाबत शासनाने मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मान्यता देण्याबाबत क्षेत्रिय अधिका-यांकडून दिरंगाई केली जात असल्याने सदर पदांपैकी काही पदांना आजतागायत वैयक्तिक मान्यता देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) व (४) अंशत: खरे आहे. १५९९ पदांपैकी १२७३ शिक्षकांना वैयक्तिक मान्यता प्रदान केल्या आहेत. आरक्षण व शैक्षणिक अर्हतेनुसार पदभरती केलेली नसलेल्या प्रकरणी वैयक्तिक मान्यता प्रदान केलेली नाही. अन्य प्रकरणी प्रस्ताव अप्राप्त/त्रुटी असल्यामुळे अद्‌याप कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उल्हासनदी प्रदूषण मुक्त करण्याबाबत

**(१५) * ३१३७८ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक २९०७७ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनदी (ता.कर्जत, जि.रायगड) ही लोणावळा जवळील राजमाचीच्या डोंगर दऱ्यात उगम पावली असून नेरळ ते कल्याण पर्यंत सर्व लहान मोठ्या शहरांतून दुषित सांडपाणी, औद्‌योगिक वसाहतीतील विनाप्रक्रिया रसायनमिश्रित सांडपाणी या नदीत सोडण्यात येत असून नेरळ शहरात वाढत्या लोकसंख्येबरोबर त्यातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी कोणतीही यंत्रणा नसल्याने, शहरातील सर्व लहान मोठ्या नाल्यांच्या माध्यमातून सांडपाणी उल्हासनदीत सोडण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) तसेच, शेलू, वांगणी, बदलापूर येथे झालेल्या मोठमोठ्या गृहसंकुलांचे व बदलापूर, अंबरनाथ महाराष्ट्र औद्‌योगिक विकास महामंडळासह उल्हासनगरमधील खेमानी नाला व जीन्स उद्‌योगातील सांडपाणी याच उल्हासनदीपात्रात विनाप्रक्रिया सोडण्यात येत असून याबाबत कल्याण प्रदूषण नियंत्रक मंडळाकडून वर्षानुवर्षे तक्रार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाणे जिल्ह्यातील सुमारे ५० लाख नागरिकांना पिण्याचे पाणी पुरवणा-या उल्हासनदीचे प्रदूषण रोखण्याबाबत कार्यवाही करुन प्रदूषण नियंत्रण मंडळातील संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) नेरळ भागातील विनाप्रक्रिया घरगुती अथवा औद्योगिक सांडपाणी उल्हास नदीमध्ये सोडण्यात येत नाही. तथापि, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विनाप्रक्रियायुक्त सांडपाणी खेमानी नाल्याद्वारे तसेच काही प्रमाणात वालधुनी नाल्याद्वारे उल्हासनदीत मिसळले जाते ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३)

- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रदान करण्यात आलेल्या संमतीपत्रातील अटी व शर्तींचे उल्लंघन केलेल्या दोषी उद्योग व सामायिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वेळोवेळी कायदेशीर कारवाई केली जाते. तसेच संबंधित महानगरपालिका व नगरपालिका यांचेमार्फत विनाप्रक्रिया केलेले घरगुती सांडपाणी नदीत थेट सोडल्या प्रकरणी संबंधितांवर न्यायालयात खटले दाखल केले आहेत.
- मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथे सदर प्रकरणी दाखल याचिकेच्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या निर्देशानुसार, विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसंबंधितांची समिती गठीत करण्यात आली आहे.
- सदर समितीच्या आजतागायत आठ बैठका झाल्या असून समितीच्या माध्यमातुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था व सामायिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व इतर संबंधित यामध्ये समन्वय साधुन आवश्यक उपाययोजना कालबध्दपणे करण्यात येत आहेत.

- मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीमार्फत नियमित आढावा घेण्यात येतो.
- मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) येथे विषारी वायूचे प्रदुषण झाल्याबाबत

**(१६) * ३२४५० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरात विविध रासायनिक कंपन्या कार्यरत असून धाटाव औद्योगिक परिसरातील मे.दिपक नायट्रेट, फिश स्टार, रवि केडीया फायनान्सिक कंपनी, स्पेक्ट्रम ते डीआरटी अथिया कंपनीच्या रस्त्यालगत असलेल्या भूमिगत गटारामधून गडद पिवळया रंगाच्या विषारी वायूच्या धुराचे डोंब बाहेर येत असल्याचे दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच व पदाधिकारी यांनी कंपनीच्या रस्त्यालगत असलेल्या भूमिगत गटारातून पिवळया गडद रंगाचे विषारी वायूचे प्रदुषण होत असल्याचे कंपनी प्रशासनाच्या निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रासायनिक कंपन्यांनी प्रदुषित होणाऱ्या वायूचे निष्कासिकरण करण्याच्यादृष्टीने तसेच परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने कार्यवाही करुन दोषी कंपन्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) सदर बाब कंपनी प्रशासनाच्या निदर्शनास आणली, हे खरे नाही.

(३) संबंधित रासायनिक कंपन्यानी हवा प्रदूषण नियंत्रणासाठी डस्टकलेक्टर (धुलीकनाची प्रदूषण रोखन्यासाठी) तसेच स्क्रबींग यंत्रणा (उत्पादन प्रक्रियेदरम्यान निर्माण होणाऱ्या वायुचे निष्काशन/नियंत्रण करण्यासाठी) तसेच जल प्रदूषण नियंत्रणासाठी औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ई.टी.पी.) बाबतची उपाययोजना केलेली आहे.

मंडळास प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने संयुक्त पाहणी केली असता दोषी आढळलेल्या उद्योगास प्रस्तावित आदेश बजावण्यात आले असून वैयक्तिक सुनावणीअंती अंतरिम आदेश बजावून एक महिन्याच्या आत योग्य ती उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात स्वस्त धान्य दुकानांवर कारवाई करण्याबाबत

**(१७) * ३४४१५ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात निदर्शनास आलेल्या स्वस्त धान्य दुकानातील तांदळाच्या काळाबाजाराचे जाळे जिल्हाभर पसरले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वस्त धान्य दुकानातील दुकानदार हे धान्य जनतेला वितरीत न करता परराज्यात पाठवितात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी स्वस्त धान्य दुकानदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, दिनांक १९/४/२०१७ रोजी तहसिलदार, फुलंब्री यांच्या पथकाने तांदळाच्या २४० गोण्या अवैध वाहतुक होत असल्याने पकडून संबंधित चालक व क्लिनर यांचेविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

(३) तहसिलदार, फुलंब्री यांच्या पथकाने दिनांक १९/४/२०१७ रोजी अवैध वाहतुक होत असलेल्या २४० तांदळाच्या गोण्या पकडल्यानंतर ०५ स्वतंत्र तपासणी पथके स्थापन केली. दिनांक १७ व १८ एप्रिल, २०१७ रोजी शासकीय धान्य गोदाम फुलंब्री येथून धान्याची उचल केलेल्या १५ रास्तभाव दुकानांची तपासणी करण्यात आली असून सदर तपासणीमध्ये ०६ रास्तभाव दुकानदारांकडे धान्य कमी आढळून आल्यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांच्या दिनांक ३१/५/२०१७ रोजीच्या आदेशान्वये उक्त ०६ रास्तभाव दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

इतर ०९ रास्तभाव दुकानदारांकडे धान्य आढळून आले तथापि त्यांचे दुकानातील अभिलेखे अद्ययावत नसल्यामुळे संबंधित रास्तभाव दुकानदारांना नोटीस देवून सुनावणी ठेवण्यात आली आहे. सुनावणीनंतर सदर प्रकरणी नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयात विधी विद्यापीठ उभारण्याबाबत

**(१८) * ३३४३१ श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २८८८६ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांचनवाडी (जि.औरंगाबाद) येथे विधी विद्यापीठ उभारण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विचाराधीन बाबींवरील शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही,

राष्ट्रीय विधी विद्यापीठ, औरंगाबाद स्थापन करण्यासाठी मौजे करोडी, ता. जि. औरंगाबाद येथील शासकीय जमीन गट क्र. २४ मधील २० हे.आर. जमीन राष्ट्रीय विधी विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठास महसुल व वन विभागाच्या शासन निर्णय दिनांक १६/०९/२०१० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सद्यस्थितीमध्ये राष्ट्रीय विधी विद्यापीठ, औरंगाबाद हे तात्पुरत्या स्वरुपात शासकीय बी.एड महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये सन २०१७-१८ पासून सुरु होत आहे.

तथापि, राष्ट्रीय विधी विद्यापीठ, औरंगाबाद हे बी.एड. महाविद्यालयाऐवजी कांचनवाडी, औरंगाबाद येथे तात्पुरत्या स्वरुपात सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) नाही.

(३) या प्रकरणाची सुसाध्यता/व्यवहार्यतेची पडताळणी करुन अंतिम निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाघाळा (ता.पाथरी, जि.परभणी) येथील रास्तभाव दुकानात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) * ३३८४१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघाळा (ता.पाथरी, जि.परभणी) येथील रास्तभाव दुकानदाराने केलेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या चौकशी पथकाने संगनमताने गैरप्रकारास पाठीशी घातले असल्याने सदरहू गैरप्रकाराची चौकशी करण्यात यावी अशी मागणी तेथील नागरिकांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद व जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित रास्तभाव दुकानदाराचा परवाना रद्द करुन दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

दिनांक २२/६/२०१७ रोजी तपासणी पथक रास्तभाव दुकानदाराला पाठीशी घालत असल्याबाबत तेथील नागरिकांचा अर्ज जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे प्राप्त झाला आहे.

(२) त्यानुसार या प्रकरणी तहसिलदार, पाथरी यांचा अहवाल विचारात घेऊन जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांच्या दिनांक १३/७/२०१७ च्या आदेशान्वये मौजे वाघाळा, तालुका पाथरी, जिल्हा परभणी येथील रास्तभाव दुकानाचा परवाना रद्द करण्यात आला आहे.

सदर प्रकरणात तक्रारदाराच्या तक्रारीची दखल घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही पार पाडण्यात आली असल्याने कोणत्याही अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील अतिरिक्त माध्यमिक शिक्षकांना वेतन देण्याबाबत

**(२०) * ३४१५० डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात अतिरिक्त ठरलेल्या माध्यमिक शिक्षकांना समायोजनानंतरही त्यांचे वेतन मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील खाजगी शिक्षण संस्थांमधील १२४ माध्यमिक शिक्षक अतिरिक्त ठरले असून १२४ पैकी १२ अतिरिक्त शिक्षक अद्यापही कोणत्याच शाळेत रुजू झाले नसून गेल्या सहा महिन्यांपासून सदर शिक्षकांना वेतन मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबत

**(२१) * ३१८६२ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव तयार करुन सादर करण्यात यावा असे निर्देश दिनांक २६ मे, २०१६ रोजी शासनस्तरावर झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी निदेशानुसार शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.

सोलापूर विद्यापीठाच्या नामविस्ताराबाबत विविध संघटना व राजकीय पक्ष यांच्याकडून प्राप्त झालेली निवेदने/पत्रे दिनांक २३/०५/२०१७ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आली होती. भविष्यात जातीय तेढ निर्माण होऊन विद्यापीठाच्या निकोप विकासाला अडथळा

निर्माण होऊ नये यासाठी सोलापूर विद्यापीठाचे नाव सोलापूर विद्यापीठच राहील असा पूर्वी सर्वानुमते घेण्यात आलेला निर्णय कायम ठेवण्याबाबत विद्यापीठाने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षण विभागातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(२२) * ३४३९० श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्कात राहण्याकरिता शिक्षण विभागाने सुरु केलेल्या १२० पैकी ९७ व्हिडीओ कॉन्फरन्स केंद्रे बंद असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील शाळांमध्ये ई-लर्निंगसाठी खरेदी करण्यात आलेल्या साहित्यांमध्ये गैरव्यवहार झाला असून उपलब्ध असलेले साहित्य उपयोगात आणले जात नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार बंद पडलेली व्हिडीओ कॉन्फरन्स केंद्रे सुरु करण्यासाठी तसेच ई-लर्निंग साहित्य गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व्हिडीओ कॉन्फरन्स केंद्रे सुरु करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. ई-लर्निंग साहित्य खरेदीत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नसल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषदेतील पूर्व वस्तीशाळा शिक्षकांना/निमशिक्षकांना टीईटीमधून वगळण्याबाबत

**(२३) * ३२२६९ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २८५१६ ला दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदांच्या सेवेत कायम झालेल्या वस्तीशाळा शिक्षकांना/निमशिक्षकांना टीईटीमधून वगळण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाला शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिफारशींमध्ये काही त्रुटी राहिल्यामुळे केंद्राकडून यास मंजुरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाने यावर अद्याप निर्णय घेतलेला नाही, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाने अभ्यासक्रमांसाठी परीक्षा शुल्कात वाढ केल्याबाबत

**(२४) * ३२६०९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने येत्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांवर १०० टक्के परीक्षा शुल्कवाढ प्रस्तावित केली असून पदवी, पदव्युत्तर, एम.फिल, पीएचडी अशा सर्व अभ्यासक्रमांसाठी ही परीक्षा शुल्कवाढ लागू होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाच्या या प्रस्तावित परीक्षा शुल्कवाढीला विद्यार्थी व विद्यार्थी संघटना यांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर परीक्षा शुल्कवाढीच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विद्यार्थी संघटनेचे कोणतेही निवेदन विद्यापीठास प्राप्त झालेले नाही.

(३) विद्यापीठामध्ये शिक्षकांकडून विविध परीक्षाविषयक कामे करुन घेतली जातात. ही कामे त्यांना त्यांची नियमित शिक्षणविषयक कामे करुन अतिरिक्तरित्या करावी लागतात. यासाठी त्यांना मानधन व येण्या-जाण्याच्या खर्चाची प्रतिपुर्ती केली जाते. गेल्या १६ वर्षात या नियमात सुधारणा करण्यात आलेली नाही. सर्व शिक्षक सवंर्गातून मानधन व प्रवास खर्च यामध्ये वाढ करण्याची मागणी वारंवार करण्यात येत असल्यामुळे यावर विचारविनिमय करण्यासाठी सर्व अधिष्ठात्यांची समिती नियुक्त करुन समितीच्या शिफारशीनुसार विविध प्राधिकरणांमध्ये तपशिलवार चर्चा होऊन सदर वाढ मान्य करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रमुख व धार्मिकदृष्टया महत्वाच्या नद्या प्रदुषणमुक्त करण्याबाबत

**(२५) * ३१३३७ डॉ.अपूर्व हिरे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने देशातील २९ राज्ये आणि ६ केंद्र शासित प्रदेशातील नद्यांच्या केलेल्या सर्वेक्षणातून महाराष्ट्रातील सर्वाधिक नद्यांचे भवितव्य धोक्यात असल्याचा इशारा दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास देण्यात आला असून प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या प्रकाशित सर्वेक्षण अहवालात महाराष्ट्रातील प्रमुख तसेच महत्वाच्या ४९ नद्या “अत्यंत प्रदूषित” असून त्यात गोदावरी, तापी, गिरणा इत्यादी नद्यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातूनच नव्हे तर तालुका आणि शहरातून सुध्दा सांडपाणी नद्यांमध्ये सोडले जाते, त्यामुळे नद्या प्रदूषित होत असल्याचे निष्कर्ष अहवालात नोंदविण्यात आले तसेच सांडपाणी, उद्योग आणि कृषि हे तिन्ही घटक नद्यांच्या प्रदुषणासाठी कारणीभूत असून त्यामुळे नद्यांमधील प्राणवायूची मात्रा दिवसेंदिवस कमी होत असल्याचेही सर्वेक्षणातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातील सर्वाधिक नद्या प्रदूषित असणे, हे पर्यावरणाच्या आणि नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने गंभीर असून यावर उपाय न शोधल्यास तसेच या नद्या प्रदुषणमुक्त न केल्यास नागरिकांचे भवितव्य धोक्यात येवू शकते, असा इशारा पर्यावरण तज्ञांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्रातील धार्मिकदृष्टया महत्वाच्या अशा गोदावरी, चंद्रभागा व अन्य सर्वच प्रमुख व अत्यंत प्रदूषित अशा श्रेणीतील नद्या प्रदुषणमुक्त करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २००९ ते सन २०१२ या कालावधीतील महाराष्ट्रातील नद्यांच्या जल गुणवत्ता निकालावर आधारित ४९ प्रदूषित नद्यांचे पट्टे मार्च २०१५ मध्ये जाहिर केले.

नदी पट्टयांतील जल गुणवत्तेतील जैविक ऑक्सिजनची मागणी (बी. ओ. डी.) हा घटक किमान ३ मिलीग्रॅम/लीटर पेक्षा जास्त आढळून आलेल्या पट्टयांचा समावेश प्रदूषित पट्टयात करण्यात आलेला आहे.

(३) व (४) राज्यातील नद्यांच्या सर्वेक्षणावरुन ४९ प्रदूषित पट्टे आढळून आले आहेत व त्यावरील प्रदूषण कमी करण्यासाठी पुढील प्रमाणे उपाय योजना करण्यात येत आहेत.

अ) राष्ट्रीय नदी कृती योजना व राज्य नदी कृती योजना राबविण्यात येत आहे.

ब) प्रदूषण नियंत्रण मंडळाने उदयोगांना विनाप्रक्रिया सांडपाण्याचा विसर्ग करण्यास बंदी घातलेली असून उदयोगातून निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून प्रक्रियाकृत सांडपाणी बाहेर सोडण्याचे निर्देश दिलेले आहेत.

क) राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका यांना सांडपाणी व नागरी घनकचरा व्यवस्थापनाबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

ड) सद्यस्थितीत ४९ पट्टयांपैकी १३ पट्टे प्रदूषित पट्टे म्हणून गणले जात नाही.

इ) राज्यात दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयान्वये नमामि चंद्रभागा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे खराबवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील अक्षया अलॉय कारखान्यामुळे वायू प्रदुषण झाल्याबाबत

**(२६) * ३२६६७ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खराबवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील अल्युमिनियम व पितळापासून वस्तू निर्माण करणाऱ्या अक्षया अलॉय प्रा.लि. कंपनीच्या कारखान्यातून दूषित वायू व धूर बाहेर सोडल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूषित वायू व धूरामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याने तहसिलदार खेड यांनी जा.क्र.कावि/फौजदारी/१०१५/२०१६ अन्वये प्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण महामंडळ, वाकडेवाडी, पुणे यांना माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या पाहाणी दरम्यान, उदयोगाच्या प्रक्रियेमधून काही प्रमाणात धूर निर्माण होऊन उद्‌योगाच्या शेडमध्ये पसरल्याचे दिसल्याने, मंडळाने दिनांक १२/०८/२०१६ रोजी समजपत्र दिले. तसेच, उदयोगाच्या प्रक्रियेमधून निर्माण होणारा धूर बाहेर जाऊ न देण्याबाबत दिनांक २४/०४/२०१७ रोजी उदयोगास अंतरिम आदेश दिले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हयातील वैनगंगा नदीचे पाणी दुषित झाल्याबाबत

**(२७) * ३३३०० श्री.परिणय फुके :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील वैनगंगा नदीच्या दुषित पाण्यामुळे सुमारे दिड लक्ष नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून नागनदीचे घाण पाणी याच नदीत मिश्रित होत असल्यामुळे तसेच इकॉर्निया वनस्पतीमुळे नदीकाठी गाळ साचला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदीकाठावरील बऱ्याच गावांमध्ये जलशुध्दीकरण सयंत्र नसल्याने नागरिकांना अशुध्द पाणी प्यावे लागत असल्यामुळे नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असून याबाबत नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभाग व जिल्हाधिकारी यांना तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) वैनगंगा नदीकाठावरील भंडारा व पवनी नगरपालिकेचे घरगुती सांडपाणी तसेच नाग नदीतील सांडपाणीही वैनगंगा नदीत मिसळत असल्याने वैनगंगा नदीच्या पात्रात काही प्रमाणात इकॉर्निया या वनस्पतीची वाढ झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे. तथापि, जिल्हा

आरोग्य अधिकारी, जिल्हा परीषद, भंडारा यांनी सदर नदीकाठावरील गावांमध्ये माहे एप्रिल, २०१७ ते जून, २०१७ पर्यंत कोणत्याही आजाराच्या साथीचा उद्रेक झाला नसल्याचे कळविलेले आहे.

(२) व (३) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, भंडारा यांनी खालीलप्रमाणे कळविल्यानूसार,

- वैनगंगा नदी काठावरील गावांमध्ये सद्यस्थितीत उपलब्ध असणाऱ्या विंधन व साध्या विहीरींचा उपयोग पाणी शुध्द करण्याची प्रक्रिया करुन (ब्लिचिंग पावडरद्वारे) पिण्याच्या पाण्याकरिता करण्यात येत असल्याचे कळविले आहे.
- उपरोक्त परिसरात शुध्द पाणी उपलब्ध होण्यासाठी ५० गावांमध्ये जलशुध्दीकरण सयंत्र बसविण्याकरिता मंजूरी प्राप्त झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये जेनेरिक औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२८) * ३२२१६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक २६९०० ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जेनेरिक औषधांची केंद्रे अधिकाधिक संख्येने सुरु करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जेनेरिक औषधे मधुमेह, हृदयविकार, कॅन्सर इत्यादी विकारांवर उपयुक्त असल्याने त्याचा सर्वसामान्यांना उपयोग होण्याच्यादृष्टीने विविध रुग्णालयांमध्ये जेनेरिक औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.
(२) अन्न व औषध प्रशासनाकडे प्राप्त होणा-या “जन औषधी स्टोअर्स” च्या परवाना मंजुरीसाठीच्या अर्जाचा प्राधान्याने निपटारा करण्याच्या सूचना सर्व क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रहाटणी (जि.पुणे) येथे कुल्फी खाल्याने बिषबाधा झाल्याबाबत

**(२९) * ३२१४३ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रहाटणी (जि.पुणे) येथे लग्न समारंभात दिनांक २१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास कुल्फी खाल्याने ५३ नागरिकांना बिषबाधा झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार कुल्फी उत्पादनावर कारवाई करुन विषबाधाचे प्रकार रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली असून चौकशी दरम्यान सदरचा व्यावसायिक विनापरवाना व्यवसाय करताना आढळून आला. त्यामुळे त्यांचेवर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार कारवाई केली असून वाकड पोलीस ठाण्यात दिनांक २२/०५/२०१७ रोजी गुन्हाही दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील रात्रशाळांमधील शिक्षकांच्या सेवा समाप्त करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत

**(३०) * ३३४५९ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १४ मे, २०१७ रोजी रात्रशाळा संदर्भात निर्गमित केलेल्या शासन निर्णयामुळे १०१० शिक्षकांच्या व ३४८ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त केल्याचे दिनांक १५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सदरच्या शासन निर्णयास राज्यातील शिक्षक संघटनांनी प्रखर विरोध करुन, त्याच दिवशी म्हणजेच दिनांक १५ मे, २०१७ रोजी मंत्रालयासमोर आंदोलन करुन शासनाचे लक्ष वेधले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासुम या स्वयंसेवी संस्थेमार्फत, रात्रशाळांना मदत करणारी योजना प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे सादर केली असता, "रात्रशाळांना मदत नको, तर त्या कशा बंद करता येतील याची योजना सादर करा" असे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी सांगितल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शिक्षक सदस्यांचा विरोध लक्षात घेऊन सदरचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.१५४१/२०१७ अन्वये मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. सदर शासन निर्णयान्वये शासनाने घेतलेली भूमिका योग्य असल्याबाबत निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिनांक १६/०६/२०१७ रोजी दिला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचांदूर (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथे क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(३१) * ३२७५४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचांदूर, (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथे विविध खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी लागणारे क्रीडा संकुल नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रीडा संकुलाअभावी अनेक होतकरु व प्रतिभावंत खेळाडूंना आपल्या क्रीडा क्षेत्राचा सराव नियमितपणे करता येत नसल्याने स्थानिक नागरिकांनी क्रीडा संकुल उभारण्यात यावे अशी मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरहू ठिकाणी क्रीडा संकुल उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

एका तालुक्यात एक क्रीडा संकुल या धोरणानुसार कोरपना तालुक्यामध्ये मौजे थोपटाळा येथील सर्व्हे नं. ११६/१२.०० हे.आर जागेत तालुका क्रीडा संकुल उभारण्यात येत आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, कोरपना क्रीडा संकुल बांधकामासाठी टप्याटप्याने रुपये १००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेले आहे.

सदर निधीतून संरक्षण भिंत, मैदान समपातळीकरण, बोअरवेल या सुविधा पुर्ण झालेले आहे. सदर कामावर रुपये १७.०० लक्ष खर्च करण्यात आला असुन संकुल समितीकडे रुपये ८३.०० लक्ष निधी शिल्लक आहे. यामध्ये विविध मैदाने, कार्यालयीन इमारत, फुटबॉल मैदान, बास्केटबॉल कोर्ट, २०० मी. धावनपथ, इ. क्रीडा सुविधाचे बांधकाम प्रगतीपथावर असुन बांधकाम पुर्ण होताच क्रीडा संकुल खेळाडुंसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात स्थलांतरामुळे मुले शाळेत जात नसल्याबाबत

**(३२) * ३४२९६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परिस्थितीमुळे वेगवेगळ्या कारणांनी स्थलांतर करणारी ६ ते १४ वयोगटांतील २ कोटींपेक्षा जास्त मुले कायद्याची पूर्णपणे अंमलबजावणी होत नसल्याने शिक्षणाच्या प्रवाहात येऊ शकली नसून पटनोंदणी पंधरवडा मोहिमेत स्थलांतरित मुलांची नावे शाळेत दाखल झाली परंतू शासनाच्या दुर्लक्षामुळे त्यांची शाळेतील नियमित उपस्थिती कमी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बालाघाट, मेळघाट, डोंगरी भाग आणि आदिवासी पाड्यांवर अजूनही वस्तीपासून १० किलोमीटरपर्यंत उच्च प्राथमिक शाळा नसल्याने, त्या शाळांना पुरेशा आणि सुविधायुक्त इमारती नसल्याचे तसेच ग्रामीण आणि दुर्गम भागातील ९० टक्के शाळांमध्ये वीज आणि पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका पाहणीनुसार १०० टक्के पटनोंदणीचे उद्दिष्ट काही प्रमाणात पाळले जात असून काही मुले केवळ हजेरी पटावरच दिसतात पण शाळेत प्रत्यक्ष गैरहजर असल्यामुळे कारणे न दाखवता इतर आर्थिक कारणास्तव या मुलांची सर्रास उपस्थिती दाखवण्यात येते आणि कधीही हजर नसलेली मुले पुढे पुढील इयत्तेत जातात, परिणामतः ग्रामीण भागातील आठव्या इयत्तेत शिकणाऱ्या ७० टक्के विद्यार्थ्यांना लिहिता वाचता, बेरीज वजाबाकी क्रियाही करता येत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शाळांचा व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हा परिषद शाळेतील मुलांना गणवेश वाटप करण्याबाबत

**(३३) * ३३३३९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता १ ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश उपक्रमांतर्गत गणवेशाऐवजी त्यांच्या बँक खात्यावर गणवेश खरेदीसाठी रुपये ४००/- देण्याचे आदेश शासनाने जारी केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोफत पुरवला जाणारा गणवेश रुपये ४००/- आणि राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यासाठी रुपये ५००/- भरावे लागत असून सदरील शासन निर्णयाविरोधात बीड जिल्हा शिक्षण समितीने विरोध केला असुन तसा ठरावही घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक ०५/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश वाटप योजनेच्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात करण्याबाबत निर्णय घेतला असून सदर निर्णयाची अंमलबजावणी सुरु आहे. तथापि, बीड जिल्हा शिक्षण समितीने याविरोधात ठराव घेतला असला तरी, प्रस्तुत शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे क्रमप्राप्त असल्याने त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील उपविभागीय प्रयोगशाळेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत

**(३४) * ३१३२१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ मे, २०१३ रोजी राज्यातील सर्व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची तपासणी करण्यासाठी तालुकास्तरावर १३८ नवीन उपविभागीय प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय झाला असून सन २०१२-२०१३ ते मार्च, २०१५ पर्यंत प्रयोगशाळेत काम करणाऱ्या रसायनी, अनुजैविक तंत्रज्ञ, प्रयोगशाळा सहाय्यक आणि मदतनीस यांना ११ महिन्यासाठी नियुक्ती देण्यात येत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल, २०१५ नंतर प्रयोगशाळेत काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना ५ व ६ महिने अशा दोन टप्प्यामध्ये तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून नियुक्ती देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील उपविभागीय प्रयोगशाळेत काम करणाऱ्या सुमारे ९०० हून अधिक कर्मचाऱ्यांनी आवश्यक शैक्षणिक अर्हता, प्रशिक्षण व अनुभव घेतलेला असताना त्यांच्या नियुक्तीबाबत शासन अन्याय करीत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन निर्णय क्र.डब्लुक्यूएम-२०१०/प्र.क्र.९५/पापु-१२, दिनांक ०३/०३/२०१२ नुसार ९९ व शासन निर्णय क्र.डब्लुक्यूएम-२०१२/प्र.क्र.१८८/पापु-१२, दिनांक २६/११/२०१२ नुसार ३९ अश्या एकूण १३८ उपविभागीय प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. प्रत्येक उपविभागीय प्रयोगशाळेमध्ये काम करणाऱ्या रसायनी, अनुजैविक तंत्रज्ञ, प्रयोगशाळा सहाय्यक आणि मदतनीस यांना ११ महिन्यासाठी नियुक्ती देण्यात येत होत्या.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन निर्णय क्र.डब्लुक्यूएम-२०१४/प्र.क्र.०८/पापु-१२, दिनांक १८/१२/२०१४ नुसार सार्वजनिक आरोग्य विभागाने सर्व उपविभागीय प्रयोगशाळा भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्याकडे दिनांक ३१/०३/२०१५ रोजी हस्तांतरित केल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन निर्णय क्र.डब्लुक्यूएम-२०१४/प्र.क्र.५९/पापु-१२, दिनांक २३/०२/२०१५ नुसार कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या कर्मचा-यांना संबंधितांसोबत करारनामा करून ६ व ५ महिने या प्रमाणे दोन टप्प्यात कार्यालयीन ३ दिवसांचा तांत्रिक खंड देवून ११ महिन्यांसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आगाशी-कुंभारवाडा (जि.पालघर) येथे रॉकेलचा काळाबाजार झाल्याबाबत

**(३५) * ३४००३ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगाशी-कुंभारवाडा (जि.पालघर) येथील रास्तभाव दुकानावर ४९०० लिटर रॉकेलचा साठा जप्त केल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदर साठा काळया बाजाराने विकताना दुकानदाराला अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त दुकानाचा परवाना रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) मौजे आगाशी कुंभारवाडा, ता.वसई, जि.पालघर येथील किरकोळ केरोसिन परवानाधारकाविरुध्द दिनांक १२/६/२०१७ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पुरवठा निरिक्षक, वसई यांनी तपासणी केली असता सदर दुकानामध्ये ४९६० लिटर केरोसिनचा साठा आढळून आला. चौकशीअंती सदर परवानाधारकाने माहे मार्च, एप्रिल व

मे, २०१७ या महिन्याचे केरोसिन शिधापत्रिकाधारकांना वितरित न करता दुकानात साठा करुन ठेवले व त्याबाबतची माहिती तहसील कार्यालयास दिलेली नसल्याचे निदर्शनास आले.

सदर परवानाधारकाविरुध्द दिनांक १३/६/२०१७ रोजी जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ चे कलम ३ मधील महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ विक्रेता आदेश, १९७९ तसेच महाराष्ट्र केरोसिन डिलर्स परवाना आदेश, १९६६ अन्वये अर्नाळा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नं. II६/१७ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी, पालघर यांनी दिनांक २५/७/२०१७ च्या आदेशान्वये सदर परवाना रद्द केला आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्यात उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नियमबाह्यरित्या शिक्षण संस्थांच्या महाविद्यालयांना मान्यता दिल्याबाबत

**(३६) * ३१६६७ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नियमबाह्यरित्या सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी १३ शिक्षण संस्थांच्या महाविद्यालयांना मान्यता दिल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहत आराखड्यात महाविद्यालयांसाठी बिंदु उपलब्ध नसणे, महाविद्यालयांसाठी आवश्यक सोई सुविधांमध्ये कमतरता असणे, कागदपत्रांमध्ये त्रुटी असणे, प्रस्ताव नसतानाही मंजुरी देणे अशा विविध कारणास्तव अधिकाऱ्यांनी विरोध केला असतानाही महाविद्यालयांना परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित महाविद्यालयांची मान्यता रद्द करुन नियमबाह्यरित्या मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, मुख्य सचिव, सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) व (३) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ८२(५) मधील परंतुकामध्ये नमुद केल्याप्रमाणे अपवादात्मक प्रकरणांमध्ये काही ठिकाणी अस्तित्वात असणारी महानगरे लक्षात घेता, तसेच या महानगराचा होणारा झपाट्याने विकास, वाढलेली लोकसंख्या व त्याची गरज लक्षात घेऊन या भागात शैक्षणिक संस्थांची असणारी गरज पहाता, तसेच ग्रामीण भागांमध्ये शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला तालुका दुर्गम व डोंगराळ भाग लक्षात घेऊन तसेच, महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी असल्याने लेखी कारणे नमुद करुन शासनाने स्वेच्छाधिकारानुसार दिनांक ५/८/२०१६ अन्वये १३ महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता मान्यता प्रदान केलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात डोंगराळ, आदिवासी व अल्पसंख्यांक भागातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेत शिक्षक अतिरिक्त झाल्याबाबत

**(३७) * ३३७५३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डोंगराळ, आदिवासी, अल्पसंख्यांक भागातील शाळेत अनेक शिक्षक विद्यार्थी संख्येअभावी अतिरिक्त झाले असल्याने दिनांक २ फेब्रुवारी २००९ च्या शासन आदेशाने वर्ग व तुकड्या टिकवण्यास विद्यार्थी संख्येत सवलत दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-१४ च्या संचमान्यतेपासून पुढील संच मान्यतेमध्ये सदर आदेशाची अंमलबजावणी करणे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संचमान्यता सुधारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) दिनांक २८/०८/२०१५ च्या शासन निर्णयानुसार याबाबतचे यापूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आलेले आहेत. दिनांक २८/०८/२०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार संचमान्यता करण्यात येत आहे.

-----------------

## अल्पसंख्यांक विभागातील कामामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३८) * ३२४७० श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्यांक विकास मंत्री यांनी मान्यता दिलेल्या कामांव्यतिरिक्त अन्य २६ कामांचा मान्यतेशिवाय संबंधित विभागातील कक्ष अधिकारी यांनी समावेश केल्याबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मान्यते व्यतिरिक्त २६ कामांचा समावेश करणाऱ्या कक्ष अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन सदर कामाची मान्यता रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) सदर २६ कामांची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे व संबंधित कक्ष अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाहीची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरसवाडी येथे इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी) सुरु करण्याबाबत

**(३९) * ३४४२३ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद-जालना येथील शिरसवाडी येथे आंतरराष्ट्रीय ख्यातीची इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी) सुरु करण्यासाठी शिरसवाडी गावातील २०३ एकर जमिनींचे हस्तांतरण माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तंत्रशिक्षण विभागाकडे करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आयसीटीसाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिरसवाडी येथे आयसीटी बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) मौ. सिरसवाडी, ता.जि.जालना येथील गट नं. १३२ मधील २०० एकर शासकीय जमीन इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी या संस्थेस महसूल व वन विभागाच्या दिनांक १७/१०/२०१६ च्या शासन ज्ञापनानुसार उपलब्ध करुन देण्यात आली आहे. शासनाच्या दिनांक १७/१०/२०१६ रोजीच्या ज्ञापनास अनुसरुन जिल्हाधिकारी जालना यांचे आदेश क्रमांक २०१७/म.शा.का./जमीन/सी.आर.२०६, दिनांक ३०/०१/२०१७ अन्वये जमीन उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे सुपूर्त करण्यात आली आहे.

(२) इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीच्या प्रस्तुत प्रकल्पाकरीता निधीची अद्याप तरतूद करण्यात आलेली नाही.

(३) इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीच्या प्रस्तुत प्रकल्पाच्या बांधकामाची कार्यवाही संस्था करणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साई इन्स्टिट्युट ऑफ इंजिनियरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी (औरंगाबाद) महाविद्यालयाची चौकशी करण्याबाबत

**(४०) * ३३४४१ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत साई इन्स्टिट्युट ऑफ इंजिनियरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाने माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१६ च्या परिक्षा शुल्काचा ९९ हजार ८०० रुपयांचा दंड विद्यापीठातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने माफ केला असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालयाची संलग्नता रद्द होत असताना सदर महाविद्यालयात प्रवेश सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तद्नुसार सदर महाविद्यालयात प्रवेश घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता कार्यवाही करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची बदनामी करणाऱ्या साई इन्स्टिट्युट ऑफ इंजिनियरिंग आणि टेक्नॉलॉजी महाविद्यालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदरील महाविद्यालयाचे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या अधिन राहून संलग्नीकरण रद्द करण्यात येत असल्याचे महाविद्यालयास दिनांक ०६/०७/२०१७ च्या पत्रान्वये, मराठवाडा विद्यापीठाकडून कळविण्यात आले आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी सदरील महाविद्यालयास प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ठ करण्यात आलेले नाही.

(३) या प्रकरणी डॉ.जी.बी. कटलाकुटे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समितीचे गठन करण्यात आलेले आहे. चौकशी समितीचा अहवाल अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील पाणीपुरवठा योजना नियमबाहयरित्या राबविल्याबाबत

**(४१) * ३३८६१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील पाणीपुरवठा योजनेत नियमभंग करणाऱ्या जिल्हयातील ११६ पाणीपुरवठा समिती अध्यक्ष व सचिवांच्या ७/१२ वर बोजा नोंदविण्याबाबतची कार्यवाही ग्रामीण पाणीपुरवठा योजना जिल्हा परिषद, परभणी यांनी सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुढील कार्यवाही करण्याबाबत जिल्हापरिषद व महसूल विभाग दिरंगाई करीत असल्याने दोषींना पाठीशी घालण्याचे प्रकार करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१५-१६ मध्ये परभणी जिल्हयातील जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत ५९ गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्याकडे तफावतीची रक्कम शिल्लक असल्यामुळे त्यांच्या ७/१२ वर बोजा टाकण्याबाबतचा आर.आर.सी. (Revenue Recovery Certificate) चा प्रस्ताव जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे सादर करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांचेमार्फत पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव यांचे ७/१२ वर बोजा टाकण्याचे आदेश संबंधित तहसिलदार यांना देण्यात आले आहेत.

(२) व (३) नाही,

७/१२ वर बोजा टाकण्यासाठी आर.आर.सी. साठी प्रस्तावित केलेल्या ५९ गावांच्या समितीकडे पाठपुरावा केल्यामुळे, ५९ पैकी १९ गावांच्या योजना पुर्ण झाल्या आहेत. १५ गावांच्या योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. ६ समितींवर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच, एका योजनेच्या समितीने तफावत रक्कम जिल्हा परिषद, परभणी यांचे खात्यामध्ये जमा केली आहे.

त्याचप्रमाणे, उर्वरीत १८ गावांच्या समितीने पाठपुरावा करुनही कामे सुरु करण्यात आली नाहीत. सदर १८ गावांच्या अध्यक्ष/सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांना वारंवार नोटीस देण्यात आल्या आहेत. तसेच, योजनांची कामे सुरु न झाल्यास अंतिम नोटीस देऊन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जनता साप्ताहिकातून केलेले लिखाण अप्रकाशित असल्याबाबत

**(४२) * ३१८६३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १९५६१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सन १९३० ते १९५५ या काळात प्रकाशित झालेल्या जनता साप्ताहिकामधील लेखनाचे मूळ दस्तऐवज डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीस प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या साप्ताहिकातील लिखाण प्रकाशित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नागपूर विद्यापीठ आणि समितीचे सदस्य-सचिव यांच्यामध्ये दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी करार करुन, जनता साप्ताहिकाचे मूळ दस्ताऐवज डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीस प्राप्त झाले असून, सदर दस्तऐवजांची फोटोकॉपी करणे, फोटोकॉपीचे सॉफ्ट कॉपीत रुपांतर करणे आणि डी.टी.पी. करणे अशी कामे सुरु आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शाळांमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर आणि ग्रंथपाल नेमण्याबाबत

**(४३) * ३२२६६ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २८५३८ ला दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक, परिचर आणि ग्रंथपाल नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊन शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शिक्षकेतर आकृतिबंधाबाबत दिनांक १२ फेब्रुवारी, २०१५ अन्वये नियुक्त समितीच्या अहवालातील शिफारशी विचारात घेण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कर्मचारी भरतीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात नागरिक धान्यापासुन वंचित राहिल्याबाबत

**(४४) * ३३६३३ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात मागील ४० वर्षे धान्य पुरवठा करणाऱ्या खारेपाटण सोसायटीने कोणतीही पूर्वसूचना न देता धान्य पुरवठा करणे थांबविले असून राजापूर पुरवठा विभागाने धान्य पुरवण्याची कोणतीही व्यवस्था केली नसल्याने सुमारे अडीचशे घरे धान्य पुरवठयापासून वंचित राहिले असल्याचे दिनांक १४ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी धान्य पुरवठा त्वरीत न झाल्यास येथील ग्रामस्थांनी उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राजापूर तालुक्यात त्वरित धान्य पुरवठा होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील पन्हाळे, शेजवली व गुंजवणे ही गावे खारेपाटण तालुका कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग या गावाला जवळ असल्याने सदर गावातील शिधापत्रिका धान्य वितरणासाठी खारेपाटण तालुका कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग येथील सोसायटीमार्फत चालविलेल्या दुकानाला जोडलेल्या होत्या. सदर धान्याचे नियतन जिल्हा पुरवठा अधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडून तहसिलदार, कणकवली यांच्याकडे वितरणासाठी उपलब्ध करुन दिले जात होते. त्यामुळे गेली अनेक वर्ष सुरळीतपणे धान्य वाटप सुरु होते.

संगणकीकरणामुळे जिल्हा-तालुका-गोदाम रास्तभाव दुकाने या साखळीमध्ये जिल्हयातील रास्तभाव दुकाने व शिधापत्रिका त्याच तालुक्यातील गोदामांना जोडण्यात आलेली आहेत. त्यामुळे रत्नागिरी जिल्हयातील राजापूर तालुक्यातील पन्हाळे, शेजवली व गुंजवणे या तीन गावातील शिधापत्रिका ज्या खारेपाटण तालुका कणकवली येथील रास्तभाव दुकानाला पूर्वी जोडल्या होत्या. आता संगणकीकरणामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील खारेपाटण दुकानाला जोडता येणे शक्य नाहीत. त्यामुळे सदर गावातील शिधापत्रिकाधारकांना खारेपाटण येथून धान्य वाटप करण्याचे बंद करण्यात आले आहे. तथापि सदर गावचे तात्पुरते व्यवस्थापन लगतच्या कौंड्ये तर्फे सौंदळ, ता. राजापूर, जिल्हा रत्नागिरी या धान्य दुकानास जोडले आहे. सदर गावांतील लोकांच्या सहमतीने एप्रिल महिन्यापासूनचे धान्य रास्तभाव दुकान कौंड्ये तर्फे सौंदळ येथून वाटप करण्यात आले आहे. आता तेथील शिधापत्रिकाधारकांची कोणत्याही प्रकारे तक्रार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वरिष्ठ महाविद्यालयातील तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(४५) * ३१३३९ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयात तासिका तत्वावर कार्यरत प्राध्यापकांना आठवड्याला किमान १४ तास व प्रती तास रुपये ५०० प्रमाणे मानधन मंजुर करुन हे मानधन दरमहा नियमितपणे देण्याबाबत शासनाकडून धोरणात्मक निर्णय घेण्याच्या विचाराधीन बाबींवर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला व त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे काय, तसेच उक्त निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, आठवड्याला फक्त ७ तास व प्रति तास रुपये २५० मानधन तसेच सदरचे मानधन प्रतीमहा न देता वर्षाला एकदाच देण्यात येत असल्यामुळे प्रस्तुत प्राध्यापकांची होणारी आर्थिक अडचण विचारात घेता याबाबतचा धोरणात्मक निर्णय केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मान्यताप्राप्त वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापकांच्या रिक्त जागांवर नियुक्त करण्यात येणाऱ्या तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या नेमणूकीस विद्यापीठाची मान्यता अनिवार्य केलेली असून या प्रक्रियेस लागणारा कालावधी पाहता रिक्त पदावर, विहित आवश्यक शैक्षणिक अर्हताधारक प्राध्यापकांचे तासिका तत्वावरील नेमणूकीस विद्यापीठ मान्यतेची असलेली सक्ती रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही. याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तंत्रशिक्षण विभागाच्या सीईटी सेलने केलेल्या नियमबाह्य कारभाराबाबत

**(४६) * ३४१०६ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य तंत्रशिक्षण विभागातर्फे अभियांत्रिकी, औषधनिर्माण आणि पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांसाठी साडेतीन लाख विद्यार्थ्यांना सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षात प्रवेश देतेवेळी तंत्रशिक्षण विभागाच्या सीईटी सेलने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी पाच हजार रुपयांचे डी.डी. घेतले असून ३७ हजार ५०० हून अधिक विद्यार्थ्यांचे डी.डी. तीन महिन्यांत बँकेत जमा न केल्यामुळे कालबाहय झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांनी डी.डी. काढण्यासाठी बँकांना कमिशन दिले असून डी.डी. कालबाहय झाल्यामुळे विद्यार्थ्यांना डी.डी. काढण्याकरीता पुन्हा बँकांना कमिशन द्यावे लागणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये मनस्ताप तसेच पैसे खर्च होत असल्यामुळे नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने दिलेल्या सूचनेनुसार कालबाहय धनाकर्षाबाबतची कार्यवाही बँकेमार्फत पूर्ण करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील नद्या प्रदूषण मुक्त करुन पाण्याची गुणवत्ता वाढविण्याबाबत

**(४७) * ३२२४९ ॲड.जयदेव गायकवाड : तारांकित प्रश्न क्रमांक २९५५५ ला दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील मुळा-मुठा, नद्या प्रदुषित झाल्या असून त्याबरोबरच इंद्रायणी, नीरा व घोड या नद्यांमधील पाण्याची गुणवत्ता कमी झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयातील नद्यांची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पुणे जिल्हयातील नद्या प्रदूषण मुक्त करुन पाण्याची गुणवत्ता वाढविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) माहे एप्रिल व मे या महिन्यात नदीच्या पाण्याची नैसर्गिक प्रवहन प्रक्रिया कमी पाण्यामुळे मंदावलेली असल्याने तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड व नदीकाठावरील महानगरपालिका, नगरपालिका, गावे या क्षेत्रातील घरगुती सांडपाणी नदीपात्रात मिसळत असल्यामुळे पाण्याची गुणवत्ता कमी झाल्याची बाब महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नदीच्या पाण्याचे करण्यात आलेल्या पृथ:करण अहवालानूसार दिसून येते.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दरमहा नदीच्या पाण्याचे पृथ:करण करण्यात येते.

राज्यातील नद्यांच्या सर्वेक्षणावरुन आढळून आलेल्या प्रदूषित पट्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी पुढील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

(अ) राष्ट्रीय नदी कृति योजनेंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी संवर्धनाच्या अनुषंगाने सांडपाणी संकलन व प्रक्रिया यासाठी केंद्र शासनामार्फत रूपये ९९०.२६ कोटी एवढ्या खर्चाचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे.

(ब) प्रदूषण नियंत्रण मंडळाने उदयोगांना विनाप्रक्रिया सांडपाण्याचा विसर्ग करण्यास बंदी घातलेली असून उदयोगातून निर्मित होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करून प्रक्रियाकृत सांडपाणी बाहेर सोडण्याचे निर्देश दिलेले आहेत.

(क) राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका यांना सांडपाणी व नागरी घनकचरा व्यवस्थापनाबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(ड) राज्यात दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयान्वये नमामि चंद्रभागा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणातील समुद्र किनाऱ्यावरील होणारे प्रदुषण रोखण्याबाबत

**(४८) * ३४२४८ अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांसाठी विविध मनोरंजनाची खेळणी चालवण्यास शासनाने परवानगी दिली असून सदरची परवानगी केव्हा व कोणत्या विभागाकडून घेण्यात आली,

(२) तसेच किनाऱ्यांवरील मनोरंजनाच्या खेळण्यांमध्ये डिझेलवर चालणाऱ्या खेळण्यांच्या वापरामुळे किनारपट्टीवरील पाणी आणि माती काळी झाल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून या काळया पाण्यामुळे त्वचेचे विकार होत असल्याची तक्रार स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्‌वारे संबंधितांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोकणातील समुद्र किनाऱ्यावरील खेळण्यांमधील डिझेलमुळे होणारे प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) याबाबतची परवानगी सन २०१० मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्याकडून देण्यात आली आहे. सन २०१६ पासून याबाबतची नुतनीकरण परवानगी प्रादेशिक बंदर अधिकारी, रत्नागिरी बंदरे समूह यांच्याकडून देण्यात येते.

(२) सदरची खेळणी पेट्रोलवर चालविली जात असल्याचे व प्रश्नाधीन तक्रार प्राप्त झाली नसल्याबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोणार (जि.बुलढाणा) येथील पंचायत समिती अंतर्गत गावे हागणदारीमुक्त करण्याबाबत

**(४९) * ३४२६४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि.बुलढाणा) येथील पंचायत समिती अंतर्गत येणारी गावे स्वच्छ भारत योजनेंतर्गत हागणदारीमुक्त करण्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अनुक्रमे ४ हजार १७१ शौचालय बांधकाम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असताना फक्त ३ हजार २१३ शौचालये बांधण्यात आले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोणार पंचायत समितीमार्फत उक्त उद्दिष्ट पूर्ण झाले नसून शासनाकडून शौचालय बांधकामाकरिता मिळालेल्या अनुदानात गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुदानामध्ये गैरव्यवहार केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात पंचायत समिती, लोणार करीता वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम एकूण ४९७४ एवढे उद्दीष्ट प्राप्त होते. त्यापैकी एकूण ३२१३ एवढे वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाले आहे. वैयक्तिक शौचालय बांधकाम अनुदान नियमानुसार लाभार्थ्याच्या खात्यात जमा होत असल्याने अनुदान वाटपामध्ये गैरव्यवहार झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उच्च शिक्षण संचालकांनी नोकर भरतीत गैरव्यवहार केल्याबाबत

**(५०) * ३१७४९ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च शिक्षण संचालकांनी नोकर भरतीत गैरव्यवहार केल्याप्रकरणी त्यांच्या निलंबनाची घोषणा मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी सभागृहात केली असून त्याबाबतची अंमलबजावणी अद्यापपर्यंत झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नेमण्यात आलेल्या समितीने मागणी करुन तसेच मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन देवून सुध्दा अद्यापपर्यंत संचालकास निलंबित न करण्याची कारणे काय आहेत, तसेच संबंधित संचालकास किती दिवसात निलंबित करण्यात येईल,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कारवाईस दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) या संदर्भात नेमण्यात आलेल्या त्रिस्तरीय समितीने निलंबनाची मागणी केलेली नव्हती. मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने निर्णय अंतिम टप्प्यात आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात संस्कृत भाषेच्या शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत

**(५१) * ३३८५४ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक २ मे, २०१२ पासून सर्व विषयाच्या शिक्षक भरतीला घालण्यात आलेली बंदी दिनांक २० जून, २०१४ च्या शासन आदेशान्वये उठविण्यात आली असून अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शिक्षक भरती करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारताची प्राचीन भाषा असलेल्या संस्कृत विषयाचा एकही शिक्षक अतिरिक्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संस्कृत विषयाच्या शिक्षकांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई विभागात संस्कृत विषयाचे ९ शिक्षक अतिरिक्त आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाली अष्टविनायक तिर्थक्षेत्र (ता.सुधागड, जि.रायगड) येथे पाणीपुरवठा योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५२) * ३३७१४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाली अष्टविनायक तिर्थक्षेत्र (ता.सुधागड, जि.रायगड) हे अष्टविनायकापैकी एक असून येथे दररोज हजारोंच्या संख्येने पर्यटक व भाविक भेट देत असून या ठिकाणी भाविक व पर्यटकांसह ग्रामस्थांना पाणीपुरवठा योजना नसल्यामुळे पिण्याच्या पाण्याची गैरसोय निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर तिर्थक्षेत्रासाठी भाविक व पर्यटकांसाठी पाणीपुरवठा योजना मंजूर करून आवश्यक निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

पाली अष्टविनायक तिर्थक्षेत्र (ता.सुधागड, जि.रायगड) येथे अस्तित्वातील जुनी योजना नादुरुस्त असल्याने तेथील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या सोईसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत वाढीव पाली नळ पाणीपुरवठा योजना शासनाकडे प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि याबाबत ग्रामपंचायतीकडे वारंवार पाठपुरावा करुनही आवश्यक ठराव प्राप्त न झाल्याने पुढील कार्यवाही करण्यात आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील शाळांमध्ये पाच दिवसाचा आठवडा करण्याबाबत

**(५३) * ३३४४७ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व प्रकारच्या शहरी व ग्रामीण भागातील शाळांमध्ये सोमवार ते शुक्रवार असा पाच दिवसाचा आठवडा करण्याचा शालेय शिक्षण विभागाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २९/०४/२०११ अन्वये शिक्षकांचे कामाचे किमान दिवस व शिक्षणाचे तास विहीत केले असून त्यानुसार शाळांनी कार्यवाही करावयाची आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथे मलनि:स्सारण केंद्रासह भुयारी गटार योजना राबविण्याबाबत

**(५४) * ३१९५७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथे मलनि:स्सारण केंद्रासह भुयारी गटार योजना राबविण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, दिनांक ५/८/२०१४ अन्वये राज्यातील ग्रामीण क्षेत्रात नाबार्डच्या अर्थसहाय्याने "ग्रामीण सांडपाणी व्यवस्थापन कार्यक्रम" अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सन २००१ च्या जनगणनेनुसार ज्या गावांची लोकसंख्या १५००० वा त्यापेक्षा जास्त आहे, ती गावे लोकसंख्येच्या उतरत्या क्रमानुसार प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्याबाबत सदर शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. या शासन निर्णयात समाविष्ट असलेल्या ११० गावांच्या यादीमध्ये लासलगाव या गावाचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे लासलगाव गावासाठी ग्रामीण सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला नाही.

नाबार्ड अर्थसहाय्यित ग्रामीण सांडपाणी प्रकल्प व्यवस्थापनासाठी ग्रामीण पायाभूत विकास निधी-१९ (RIDF-XIX) अंतर्गत उपरोक्त ११० गावांच्या यादीतील टप्पा १ म्हणून २८ गावांसाठी ग्रामीण सांडपाणी व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

सदर २८ गावांच्या रक्कम रूपये ११२५८.३८ लक्ष एवढया प्रकल्प किंमतीस शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, दिनांक ७/८/२०१४ अन्वये तत्वत: प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जैतापूर (जि.रत्नागिरी) गावात नळ पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५५) * ३३६३६ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जैतापूर (जि.रत्नागिरी) गावात मागील सात वर्षापासून नळाद्वारे पिण्याचे पाणी येत नसल्याने ग्रामस्थांनी संताप दर्शविल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नळ पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सन २०१४-१५ मध्ये जैतापूर नळ पाणीपुरवठा योजनेस मंजूर देण्यात आली होती. होळी येथील ग्रामस्थांनी विहीरीचे पाणी देण्यास हरकत घेतल्याने योजना सुरु होऊ शकली नाही. सद्य:स्थितीत जैतापूर पाणीपुरवठा योजनचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ च्या कृती आराखडयात समावेश करण्यात आला आहे.

-----------------

## राज्यातील नर्सरीचे प्रवेश कायद्याच्या कक्षेत आणण्याबाबत

**(५६) * ३१४७९ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २९१३१ ला दिनांक २० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विनापरवाना इंग्रजी माध्यमाच्या खाजगी नर्सरी/शाळांचे प्रमाण वाढले असून या शाळांकडे दर्जेदार शिक्षणाच्या कोणत्याही शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध नसताना मोठ्या प्रमाणात शुल्क आकारणी करून त्यांच्याकडून नियमांचे उल्लंघन करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले असून अनधिकृत शाळांवर कायदेशीर नियंत्रणाच्या अनुषंगाने राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षणाबाबतचे धोरण व कायदा तयार करण्याबाबत शासनस्तरावरून सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात इंग्रजी माध्यमाच्या खाजगी नर्सरी/शाळांची संख्या वाढली असून शैक्षणिक व भौतिक सुविधा आणि प्रशिक्षित तसेच विहीत शैक्षणिक अर्हता असलेले शिक्षक यांची कमतरता असतानाही नर्सरी व शाळांचे संचालन केले जात असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शैक्षणिक व भौतिक सुविधांनी ग्रासलेल्या खाजगी नर्सरी, शाळांविरुध्द कोणतीही कारवाई होत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व पालकांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, विनापरवाना व बेकायदेशीररित्या चालविल्या जाणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या खाजगी नर्सरी/शाळांवर नियंत्रणाकरिता तयार करण्यात आलेल्या पूर्व प्राथमिक शिक्षणाबाबतच्या धोरण व कायद्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, प्रस्तुत धोरण व कायदा तयार करण्याबाबतची कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही. पूर्व प्राथमिक शिक्षणाचे नियंत्रण करण्यासाठी धोरण व कायदा तयार करण्याची बाब शासनस्तरावर सुरु आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या प्रस्तावित कायद्यामध्ये पूर्व प्राथमिक शाळा सुरु करण्याचे धोरण व परवानगी, शिक्षण शुल्क, पायाभूत सुविधा, प्रवेश व अभ्यासक्रम या बाबींचा समावेश करण्यात येत आहे. प्रस्तावित कायद्याच्या मसुद्याला लवकरच अंतिम स्वरुप देण्यात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि. ठाणे) येथील SICES साऊथ इंडियन शाळेतील संस्थेवर कारवाई करण्याबाबत

**(५७) * ३४२४९ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि. ठाणे) येथील SICES साऊथ इंडियन शाळेत सामान्य कुटुंबातील मुले शिक्षण घेत असून या शाळेत मुलांकरीता मुलभूत सुविधा नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुलभूत सुविधा म्हणजे मुलांच्या प्रसाधनगृहात पाणी नसणे, मुलांना पिण्याकरिता पाणी नसणे, शाळेच्या खिडक्यांच्या काचा तुटलेल्या असल्यामुळे पावसाचे पाणी वर्गात येणे इत्यादीमुळे शाळेत शिक्षण घेत असलेल्या मुलांचे अतोनात हाल होत असून शाळा प्रशासन पालकांकडून मोठया प्रमाणात शुल्क वसूल करीत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मुलभूत सुविधांकरीता पालकांनी अनेक वेळा मुख्याध्यापकांना तक्रार करुनही तक्रारीचे निवारण होत नसल्यामुळे पालक त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयातील नळ योजनांच्या ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(५८) * ३४२६८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील डव्वा, खजरी, कोहळीटोला/आदर्श, डोंगरगाव/खजरी, वडेगांव, देहगांव, सतोना, पिंडकेपार, कोडेलोहारा, गुमाधावडा, कनेरा/राम, पूरगाव, भरेंगाव तसेच इतर गावातील नळ योजनांना मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत माहे फेब्रुवारी, २०१७ ते मे, २०१७ या कालावधीत मंजूरी मिळाली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर नळ योजनांची ई-निविदा प्रक्रिया अद्यापपर्यंत पूर्ण करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन योजनांच्या ई-निविदा प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) सदर योजनांना प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखालील तांत्रिक समितीने माहे फ़ेब्रुवारी ते मे-२०१७ दरम्यान मान्यता दिली आहे. तथापि सदर योजनांची प्रशासकीय मंजूरी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अखत्यारित येते. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी सदर योजनांना दिनांक ०५/०५/२०१७, दिनांक २५/०५/२०१७ व दिनांक १२/०७/२०१७ रोजी प्रशासकीय मंजूरी दिली आहे.

(२) व (३) सदर प्रशासकीय मंजूरी प्राप्त सर्व योजनांच्या ई-निविदेकरिता आवश्यक सर्व कागदपत्रे व प्रपत्र तयार करण्यात आली असून, निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.